# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

एम.आय.डी.सी.रोड,कॉम्पलेक्स,गडचिरोली – ४४२६०५

दुरध्वनी क्र. ०७१३२–२२३३२४ ईमेल developmentcellgug@gmail.com


जा.क्र. गो.वि./कुलका/12725/२०२० दिनांक –18 /१२/२०२०

## जाहिरात

**शैक्षणिक सत्र २०२१–२२ करीता नवीन महाविद्यालये/ नवीन अभ्यास पाठयक्रम/ विद्याशाखा/विषय/अतिरिक्त तुकडी व कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाकरीता अर्ज मागविण्याबाबत**

सर्व संबधितांच्या माहितीकरिता सुचित करण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली द्वारे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०७ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक सत्र २०२१–२२ या कालावधीकरिता तयार करण्यात आलेल्या बृहत आराखडयास (Perspective Plan) राज्यशासनाद्वारे दि. १७ डिसेंबर, २०२० चे पत्राद्वारे मंजुरी प्रदान केली असुन सदर बृहत आराखडयातील तरतुदीनुसार नवीन महाविद्यालये, नवीन अभ्यास पाठयक्रम, विद्याशाखा, विषय, अतिरिक्त तुकडी व कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाकरिता सत्र २०२१–२२ करिता इच्छुक संस्था/अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०९ अन्वये **दि. ३१ डिसेंबर, २०२० रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत** आवश्यक त्या शुल्कासह संगणीकीकृत **(Computerized)** केलेले अर्ज सादर करावे. नवीन महाविद्यालये, नवीन अभ्यास पाठयक्रम, विद्याशाखा, विषय, अतिरिक्त तुकडी याकरिता शासन निर्णयामधील अर्जाचा नमूना व निकष विद्यापीठाचे www.unigug.ac.in या संकेतस्थळावर विकास विभाग **(Development Cell)** तसेच **News & Announcements** वर उपलब्ध आहे.

ज्या संस्था/महाविद्यालयांना नवीन महाविद्यालये, नविन अभ्यास पाठयक्रम, विद्याशाखा, विषय, अतिरिक्त तुकडी व कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम याकरिता अर्ज सादर करावयाचे आहे. त्या संस्था/महाविद्यालयांनी अर्जासाठी वित्त व लेखा विभागातून रू १०५०/– भरून बृहत आराखडा विकत घेणे तसेच अर्ज प्रक्रिया शुल्क रू. १०००/– भरणे अनिवार्य आहे. सोबतच बृहत आराखडयामध्ये नमुद केल्यानुसार प्रस्तावाकरिता आवश्यक ते प्रस्ताव शुल्क वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे नावे काढलेल्या धनाकर्षाद्वारे वित्त व लेखा विभागात जमा करून त्याची पावती अर्जासोबत जोडावी. तसेच नविन महाविद्यालयाचे प्रस्तावासोबत शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि–४, दि. १५ सप्टेंबर, २०१७ मधील शासन निर्णयात नमुद केल्यानुसार तसेच नविन अभ्यास पाठयक्रम, विद्याशाखा, विषय, अतिरिक्त तुकडी यासाठी प्रस्तावासोबत शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/ (२०८/१७)/मशि–४ दि. १३ सप्टेंबर, २०१७ मधील शासन निर्णयात नमुद केल्यानुसार आवश्यक ते संपुर्ण कागदपत्रे क्रमवार पध्दतीने प्रस्तावासोबत जोडून सहा प्रतीमध्ये Hard व Soft Copy सह प्रस्ताव विद्यापीठ विकास विभागात **दि. ३१ डिसेंबर, २०२० रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत** सादर करावे. पारंपारिक व व्यावसायिक नवीन महाविद्यालयाकरीता स्वतंत्र प्रस्ताव सादर करावे. तसेच नवीन अभ्यास पाठयक्रम, विद्याशाखा, विषय, अतिरिक्त तुकडी व कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम याकरीता महाविद्यालयांना स्वतंत्र वेगवेगळे प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहील. एकत्रीतरित्या सादर केलेले प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाही.

वरीलप्रमाणे नवीन महाविद्यालये, नवीन अभ्यास पाठयक्रम, विद्याशाखा, विषय, अतिरिक्त तुकडी याकरीता महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाकडुन **(MAHED)** मंजुर बृहत आराखडयानुसार तसेच शासन निर्णय दि. १३ सप्टेंबर, २०१७ व दि. १५ सप्टेंबर, २०१७ मधील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या पात्र अर्जाचा विचार केला जाईल. तसेच नवीन महाविद्यालयाकरिता बृहत आराखडयाबाहेरच्या ठिकाणासाठी अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी. संस्था/महाविद्यालयांना अर्ज सादर करण्यासाठी मार्गदर्शक सूचना व इतर माहिती विद्यापीठाचे संकेतस्थळ www.unigug.ac.in वर उपलब्ध आहे.

18/12/2020

(डॉ.अनिल चिताडे)
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६)व्दारा संचालित राज्य विद्यापीठ

*विद्यापीठ विकास विभाग*

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५ (महा.)
फोन :०७१३२–२२३३२२ फॅक्स क्र.०७१३२–२२३३२२
**Email :** bcud.gondwanauniversity@gmail.com


जा.क्र.गो.वि./वि. विकास विभाग/ १५८ /२०२० दिनांक : २१ /१२ /२०२०

**नवीन महाविद्यालय, नवीन अभ्यास पाठयक्रम,विद्याशाखा,विषय, अतिरीक्त तुकडी इ. साठी प्रस्ताव सादर करण्याकरिता मार्गदर्शक सूचना.**

१.परंपरागत व व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी वेगवेगळे प्रस्ताव सादर करावेत.

२.संस्था/महाविद्यालयांनी अर्जासाठी **वित्त व लेखा विभागातुन** रू. १०५०/— भरून बृहत आराखडा विकत घेणे तसेच प्रक्रिया शुल्क रू. १०००/— भरणे अनिवार्य आहे.

३.ज्या संस्थांना/महाविद्यालयांना नवीन महाविद्यालये,नवीन अभ्यास पाठयक्रम,विद्याशाखा,विषय,अतिरीक्त तुकडी इ. साठी प्रस्ताव द्यावयाचा आहे त्यासाठी विद्यापीठाने ठरविलेले प्रस्ताव आवेदन शुल्क भरावे. आवेदन शुल्क मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या नावाने डी. डी. द्वारे भरावे लागेल.

४.नविन महाविद्यालयाचे अर्जाकरिता **शासन निर्णय दि. १५ सप्टेंबर २०१७** सोबतच्या परिशिष्ट 'अ' मधील अर्जाच्या नमुन्यात संगणिकीकृत **(Computrised)** करून परिशिष्ट 'ब' मध्ये माहिती भरून व त्यामध्ये नमूद केलेली कागदपत्रे क्रमवार पध्दतीने मुळ प्रतींची फाईल व इतर (०५) फाईल असे एकूण ०६ फाईल्समध्ये साक्षांकित केलेली कागदपत्रे जोडून प्रस्ताव सादर करावा. सर्व फाईलमधील कागदपत्रे एक समान असावी. संस्थेनी परिपूर्ण भरलेले अर्ज **दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजी कार्यालयीन वेळेत** विद्यापीठात सादर करावे. अपूर्ण भरलेले अर्ज व विहीत मुदतीनंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

५.नवीन अभ्यास पाठयक्रम,विद्याशाखा,विषय,अतिरीक्त तुकडी इ. चे अर्जाकरिता **शासन निर्णय दि. १३ सप्टेंबर २०१७** सोबतच्या परिशिष्ट 'अ' व प्रपत्र 'ब' मधील अर्जाच्या नमुन्यात संगणिकीकृत **(Computrised)** करून परिशिष्ट 'ब' मध्ये माहिती भरून व त्यामध्ये नमूद केलेली कागदपत्रे क्रमवार पध्दतीने मुळ प्रतींची फाईल व इतर (०५) फाईल असे एकूण ०६ फाईल्समध्ये साक्षांकित केलेली कागदपत्रे जोडून प्रस्ताव सादर करावा. सर्व फाईलमधील कागदपत्रे एक समान असावी. संस्थेनी परिपूर्ण भरलेले अर्ज **दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०२० रोजी कार्यालयीन वेळेत** विद्यापीठात सादर करावे. अपूर्ण भरलेले अर्ज व विहीत मुदतीनंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

६.प्रस्तावासोबत जोडण्यात येणारी कागदपत्रे स्वयं स्पष्ट दिसणारी असावीत व संस्थेच्या अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांनी साक्षांकित केलेली असावीत.

७.अर्जासोबत, संस्थेने भरलेल्या बृहत आराखडा शुल्क, प्रक्रिया शुल्क व प्रस्ताव शुल्क पावतीच्या मुळ प्रती प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक असून सदर शुल्काच्या प्रती न जोडणाऱ्या संस्था/महाविद्यालयांचे अर्ज स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

८.प्रस्तावातील प्रत्येक कागदाला पेज नं. देण्यात यावे. शासन निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार कागदपत्रे अर्जासोबत जोडावित. प्रस्तावाच्या सुरूवातीला अनुक्रमणिका (Index) केलेले असावे. 'परिशिष्ट ब' मध्ये अनुक्रमांनुसार कागदपत्रे कोणत्या पेज नंबर पासून कोणत्या पेज नंबर पर्यंत जोडले आहे, ते नमुद करावे.

९.अपूर्ण असलेले / अपूर्ण भरलेले अर्ज विद्यापीठाद्वारे स्विकारण्यात येणार नाही.

१०.संस्थेनी पारंपारिक व व्यावसायिक नविन महाविद्यालयासाठी अर्ज करावयाचा असल्यास वेगवेगळा अर्ज करावा. एकत्रितरित्या केलेला अर्ज स्विकारण्यात येणार नाही. तसेच संस्था/महाविद्यालयांनी नविन अभ्यास पाठयक्रम/विद्याशाखा/विषय/अतिरीक्त तुकडी यासाठी वेगवेगळे अर्ज सादर करावा. एकत्रितरित्या केलेला अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

११.मुळ प्रस्ताव व त्रृटी पूर्तता प्रस्तावातून शासन निर्णयातील कोणत्याही बाबी संदर्भातील त्रृटींची पूर्तता होत नसल्यास संस्थेचा अर्ज कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्याचे अधिकार विद्यापीठाचे राहील. त्याबाबत विद्यापीठाने घेतलेला निर्णय संस्थेस बंधनकारक राहील.

१२.अर्ज करतांना काही तांत्रिक अडचणी आल्यास खालील हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावे. ०७१३२–२२३३२४, २२३३२२

२१/१२/२०२०

**कुलसचिव(प्र.)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## CHART - XV

## Proposal Application Fees Structure of New Colleges, Additional Faculty / Courses / Intake For Following Faculties

| | | Amount |
|---|---|---|
| | **A) Application Fees Structure of New Colleges Humanities, Commerce & Management, Science & Technology and Inter-disciplinary Studies Faculties** | |
| 1. | a) Single Faculty | ₹ 25,000.00 |
| | b) Double Faculties | ₹ 40,000.00 |
| | c) Three or more Faculties | ₹ 50,000.00 |
| 2. | New College of Law Faculty | ₹ 3,00,000.00 |
| 3. | New College of Education Faculty (B.Ed./B.P.Ed.) | ₹ 3,00,000.00 |
| 4. | New College of Engineering/ Pharmacy/ M.B.A. / P.G.D.M. / M.C.A. | ₹ 5,00,000.00 |
| | **B) Starting of New Courses** | |
| 1. | a) Traditional Courses | ₹ 20,000.00 |
| | b) Professional U.G. Courses | ₹ 30,000.00 |
| | c) Professional P.G. Courses | ₹ 30,000.00 |
| | **C) Starting of New Subject / Section** | |
| 1. | a) Traditional Courses | ₹ 15,000.00 |
| | b) Professional Courses | |
| | i) Law and Education | ₹ 30,000.00 |
| | ii) Engineering and Pharmacy (U.G.) | ₹ 30,000.00 |
| | iii) Engineering and Pharmacy (P.G.) Section / Courses | ₹ 50,000.00 |
| | iv) MBA /MCA | ₹ 30,000.00 |

नोट: वरील संदर्भात विद्यापीठाच्या प्राधिकरणाच्या मान्यतेनुसार व शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या निर्णयानुसार होणारे बदल बंधनकारक राहील.

# Gondwana University, Gadchiroli

## Annual Perspective Plan for the year 2021-22

### A) Locational Plan for New Woman Colleges

| Sr. No. | District wise No. of Colleges | Taluka | Location for proposed Colleges | Proposed Colleges & Faculties - Arts (A) / Commerce (C) / Science (S) / Fine Arts (FA) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | No of Colleges | A | C | S | FA |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** |
| 1 | **Gadchiroli-08** | Bhamragad | Bhamragad | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| | | Korchi | Korchi | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| | | Sironcha | Sironcha | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| | | Etapalli | Etapalli | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| | | Dhanora | Dhanora | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| | | Mulchera | Mulchera | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| | | Wadsa | Wadsa | 01 | | ✓ | ✓ | |
| | | Armori | Armori | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| 2 | **Chandrapur-03** | Korpana | Korpana | 01 | | ✓ | ✓ | |
| | | Mul | Mul | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| | | Warora | Warora | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| **Total No of Colleges** | | | | **11** | | | | |

## B) Locational Plan for New Night Colleges

| Sr No | Name of the Taluka | Place of Location | No of College/s | Faculty | Courses |
|---|---|---|---|---|---|
| **Gadchiroli District** | | | | | |
| 1 | Gadchiroli | Gadchiroli | 1 | Arts | B.A. |
| | | | 1 | Science | B. Sc. |
| | | | 1 | Commerce & Management | B.B.A., B. Com |
| **Chandrapur District** | | | | | |
| 2 | Chandrapur | Chandrapur | 1 | Arts | B.A. |
| | | | 1 | Science | B. Sc. |
| | | | 1 | Humanities | Law |
| | | | 1 | Commerce | B. Com |
| 3 | Bramhapuri | Bramhapuri | 1 | Science | B. Sc. |
| | | | 1 | Arts | B.A. |
| | | | 1 | Commerce & Management | B.B.A., B. Com |
| | | | 1 | Humanities | Law |
| **Total number of colleges** | | | **05** | | |

## C) Locational Plan for New Colleges

| Sr. No. | District wise No. of Colleges | Taluka | Location of proposed College | Proposed Colleges & Faculties - Arts (A) / Commerce (C) / Science (S) / Fine Arts (FA) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | No of Colleges | A | C | S | FA |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | Gadchiroli | Aheri | Aheri | 01 | | | | ✓ |
| 2 | | | Permilli | 01 | ✓ | | | |
| 3 | | Chamorshi | Regdi | 01 | ✓ | | | |
| 4 | | | Chamorshi | 01 | ✓ | ✓ | | ✓ |
| 5 | | Gadchiroli | Gadchiroli | 01 | ✓ | ✓ | | ✓ |
| 6 | | Kurkheda | Kurkheda | 01 | ✓ | ✓ | | ✓ |
| 7 | | | Kharmattola | 01 | ✓ | | | |
| 8 | | | Kadholi | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| 9 | | Mulchera | Sundarnagar | 01 | ✓ | | | |
| 10 | | | Mulchera | 01 | | | | ✓ |
| 11 | | Sironcha | Sironcha | 01 | | | | ✓ |
| 12 | | | Asaralli | 01 | ✓ | | | |
| 13 | | Bhamragad | Bhamragad | 01 | | ✓ | ✓ | ✓ |
| 14 | | Korchi | Korchi | 01 | ✓ | ✓ | | ✓ |
| 15 | | Etapalli | Etapalli | 01 | | ✓ | | ✓ |
| 16 | | | Kasansur | 01 | ✓ | | | |
| 17 | | Dhanora | Dhanora | 01 | | | | ✓ |
| 18 | | | Murumgaon | 01 | | ✓ | | |
| 19 | | Wadsa | Wadsa | 01 | | | | ✓ |
| 20 | | Armori | Armori | 01 | | | | ✓ |
| 21 | Chandrapur | Ballarpur | Kothari | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| 22 | | | Ballarpur | 01 | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| 23 | | Bhadravati | Bhadravati | 01 | | | | ✓ |
| 24 | | | Majri | 01 | ✓ | ✓ | ✓ | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 25 | | Bramhapuri | Bramhapuri | 01 | | | | ✓ |
| 26 | | Chandrapur | Chandrapur | 01 | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| 27 | | Chimur | Chimur | 01 | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| 28 | | | Bhisi | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| 29 | | | Neri | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| 30 | | Korpana | Korpana | 01 | | ✓ | | ✓ |
| 31 | | | Gadchandur | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| 32 | | | Awarpur | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| 33 | | Nagbhid | Nagbhid | 01 | | | | ✓ |
| 34 | | | Talodhi-Balapur | 01 | ✓ | ✓ | ✓ | |
| 35 | | | Kampa | 01 | ✓ | | | |
| 36 | | | Wadhona | 01 | ✓ | | ✓ | |
| 37 | | Sindewahi | Sindewahi | 01 | | | | ✓ |
| 38 | | | Nawargaon | 01 | | | | ✓ |
| 39 | | | Ratnapur | 01 | | | | ✓ |
| 40 | | Warora | Warora | 01 | | | ✓ | ✓ |
| 41 | | | Khambada | 01 | ✓ | ✓ | | |
| 42 | | Mul | Mul | 01 | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| 43 | | | Rajoli | 01 | | | ✓ | |
| 44 | | Saoli | Saoli | 01 | | | | ✓ |
| 45 | | | Pathri | 01 | ✓ | ✓ | | |
| 46 | | Jiwati | Jiwati | 01 | | | | ✓ |
| 47 | | | Tekamandwa | 01 | ✓ | | | |
| 48 | | Gondpipri | Gondpipri | 01 | | | | ✓ |
| 49 | | | Dhaba | 01 | ✓ | | | |
| 50 | | Rajura | Rajura | 01 | | | | ✓ |
| 51 | | Pombhurna | Pombhurna | 01 | | | | ✓ |
| **Total Number of Colleges** | | | | **51** | | | | |

## D) Locational Plan for Other than Traditional Courses

| Sr. No. | Name of the District | Taluka | Location of proposed College | Proposed Faculty – Inter-Disciplinary Studies | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | No of Colleges | Name of the Courses: B.S.W. and M.S.W. |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | Gadchiroli | Gadchiroli | Gadchiroli | 01 | ✓ |

## E) Locational Plan for Other than Traditional Courses

| Sr. No. | Name of the District | Taluka | Location of proposed College | Proposed Faculty – Inter-Disciplinary Studies | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | No of Colleges | Name of the Course: B.Ed. (Special) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | Gadchiroli | Gadchiroli | Gadchiroli | 01 | ✓ |
| | | | Aheri | 01 | ✓ |
| 2 | Chandrapur | Chandrapur | Chandrapur | 01 | ✓ |

## F) Skill Development Colleges under section 112 and 113 of the M. P. U. Act 2016.

Proposals are invited for providing skill education relevant to the needs of the local region under the provisions of section 112 and 113 of the Maharashtra Public Universities Act 2016. The applicants are to submit the appropriate proposals as skill knowledge provider/s within the region under the jurisdiction of Gondwana University, Gadchiroli.

| Sr. No. | Name of the District | Taluka | Location of proposed College | Under Board of Deans and Inter-Disciplinary Studies for Skill Development | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | No of Colleges | All Courses including relevant to the local region |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | Chandrapur | Chandrapur | Chandrapur | 01 | ✓ |
| | | | Bramhapuri | 01 | ✓ |

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७च्या महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६)व्दारा संचालित राज्य विद्यापीठ

विद्यापीठ विकास विभाग

जा.क्र.गो.वि./वि. विकास विभाग/ १६० / २०२० दिनांक : २१/१२ /२०२०

## कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रमासाठी प्रस्ताव सादर करण्याकरिता मार्गदर्शक सुचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, नुसार शैक्षणिक सत्र २०२१–२२ करिता **कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम** सुरू करण्याकरीता संस्था आणि महाविद्यालयांकडुन प्रस्ताव मागविण्यात येत असून विहीत नमून्यात **दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजी** पर्यंत किंवा त्यापुर्वी सदर प्रस्ताव विद्यापीठात सादर करावयाचे आहेत. वित्त व लेखा विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या ठिकाणी बृहत आराखडयाची प्रत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. बृहत आराखडा शुल्क रूपये १०५०/– असून प्रक्रिया शुल्क रूपये १०००/– असे निश्चित करण्यात आले आहे. अर्ज घेतल्यानंतर विद्यापीठ संकेतस्थळावर **unigug.ac.in** वर मार्गदर्शक सुचना उपलब्ध करून दिलेल्या आहेत, त्यानुसारच अर्ज **Hard** व **Soft** कॉपीमध्ये ०३ (तीन) प्रतित विद्यापीठाला सादर करावा.

गोंडवाना विद्यापीठ परिक्षेत्राअंतर्गत भविष्यात सुरू होणाऱ्या उद्योगाला व स्थानिक क्षेत्राला असलेली मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेता कौशल्य विकासावर आधारीत ४७ नवीन अभ्यासक्रम बृहत आराखडयात प्रस्तावित केलेले आहे. याव्यतिरिक्त विद्यापीठ परिसरातील संस्था व महाविद्यालयांना स्थानिक भागाशी निगडीत असणारे कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम सुरू करण्याची मुभा देण्यात आलेली आहे.

सर्व संबधिताच्या माहितीकरीता कळविण्यात येते की, अर्जासोबत भरावयाचे शुल्क प्रपत्र सोबत जोडलेले असून सदर शुल्क वित्त व लेखा अधिकारी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे नावे धनाकर्ष काढून विद्यापीठ खाती जमा करावयाचे आहेत. सर्व संबधितांनी अर्ज सादर करतांना सुचनांचे पालन करून विहित मुदतीत अर्ज विद्यापीठाला सादर करावेत.

**कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम लागु असलेल्या अटी व शर्ती**

१) अभ्यासक्रमामध्ये प्रात्यक्षिकाचे प्रमाण किमान ५०% असावे.

२) अभ्यासक्रमासंबधित उद्योग क्षेत्र अथवा संस्था सोबत सामंजस्य करार असणे अपेक्षित असून त्याद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांना प्राप्त कौशल्याचा उपयोग करणे सोईचे होईल. तसेच विद्यार्थ्यांना थेट प्रशिक्षणाची सोय सुध्दा उपलब्ध होईल.

३) सदर अभ्यासक्रमाचे परीक्षा व मुल्यमापन इत्यादी संबंधीत महाविद्यालयाला घ्यायचे असून प्रवेशीत विद्यार्थ्यांचे विद्यापीठातील परीक्षा विभागात प्रचलित शुल्कासहीत नोंदणी व नामांकन करणे आवश्यक असणार जेणेकरून त्यांना संबधीत अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्र देता येईल.

४) सदर कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमासाठीचे आवश्यक शैक्षणिक व इतर शुल्क विद्यापीठाच्या विद्या विभाग अंतर्गत सक्षम प्राधिकरणास अर्ज देवून मान्यता घेण्यात यावी.

५) प्रत्येक अभ्यासक्रमासाठी नामांकन शुल्क १२५/– रूपये प्रति बाहय:शाल विद्यार्थीसाठी व ५०/– रूपये महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी आकारण्यात यावे.

६) प्रमाणपत्राचे प्रारूप विद्यापीठातर्फे पुरविण्यात येईल व स्वाक्षरी संबंधीत महाविद्यालयातील प्राचार्य, अभ्यासक्रमाचे संयोजक व विद्यापीठातील सक्षम अधिकारी करतील. तसेच प्रमाणपत्राचे मुद्रांकन महाविद्यालयांनी करावे.

२१/१२/२०२०

कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६
(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली– ४४२६०५

फोन/फॅक्सनंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail : registrar.gondwanauniversity@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुलका/ 8159 /२०१८ दिनांक :२९/०९/२०१८

### परिपत्रक

शैक्षणिक सत्र २०१९–२० या वार्षिक बृहत आराखडयामध्ये Certificate व Skill Courses प्रस्तावित केलेले आहे. शुल्क निर्धारण समितीने Certificate व Skill Courses करीता खालील प्रमाणे शुल्क निर्धारीत केलेले असून सर्व संबधितांनी Certificate व Skill Courses चे प्रस्ताव सादर करतांना पुढील प्रमाणे प्रस्ताव शुल्क सादर करावे.

| Sr.No. | Certificate/Skill Courses Duration | Proposal Fees (Per Course) |
|---|---|---|
| 1 | Six Month Certificate Course | 4500/- |
| 2 | One Year Diploma/Certificate Course | 6000/- |
| 3 | Two Year Degree Course | 7500/- |
| 4 | Three Year Degree Course | 9000/- |

डॉ.ईश्वर एस.मोहुर्ले
कुलसचिव(प्रभारी)
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

## Proforma for affiliation of "Skill Development Courses"

**I (a). Governing Trust / Society Details:**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name** | | | | | |
| **Category** | | | | | |
| **Nature** | | | | Other | |
| | | | | Other | |
| **Owner/ Partner/ Director/ Office Bearers** | **Name** | | **Designation** | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | **Chairperson** | | |
| | | | **Director** | | |
| **Address** | | | | | |
| | | | | | |
| | **Village** | | **District** | | |
| | **Taluka** | | **PIN** | | |
| **Contact** | **Telephone** | | **Mobile** | | |
| | **Fax** | | **E-mail** | | |

**I (b). Training Institute / College Details (Training Centre):**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name** | | | | | |
| **Institute Head** | **Name** | | **Designation** | **Qualification** | **Experience** |
| | | | | | |
| **Address Of Institute** | | | | | |
| | | | | | |
| | **Village** | | **District** | | |
| | **Taluka** | | **PIN** | | |
| **Contact** | **Telephone** | | **Mobile** | | |
| | **Fax** | | **E-mail** | | |

**I (c). Financial Transaction Details:**

| | | | |
|---|---|---|---|
| **PAN No.** | | **Service Tax No.** | |
| **Bank Name** | | **Branch** | |
| **Account No.** | | **IFSC Code** | |

**I (d). Whether affiliated/accredited with Other Agency?** **Yes / No**

(NSDC/Sector Skill Council/University/Foreign Body)

**If yes, attach affiliation/accreditation and module details as Annexure**

**I (e). Details for Empanelment of Trainers':** **Annexure I**

## II. Operational Details:

**2.1 Whether the signage board of the Institute displayed?** **Yes / No**

(Front Photo of the building showing the board be attached))

**2.2 Premises Details:**

**(a) Whether own/rented?** **Own/Rented**

Agreement Copy be attached)

**(b)Whether dedicated or shared?** **Dedicated / Shared**

| **If shared, the institute is part of a campus/building, Specify details:** | |
|---|---|
| **User Details** | School/College/Training/Coaching/Residential/Commercial/Industrial/Social |

**(c) Approved Electricity load Certificate** **Yes / No**

**(Electricity Bill / Sanction certificate)**

**2.3 Training Infrastructure:**

**(a) Space:** **Annexure II**

(One photo of each module specific space be enclosed)

**(b) Equipment's & Machinery:**
(One photo of each module specific equipment) - **Annexure III**

**(c) Details of Consumables / Raw Material Required / Procured:** **Annexure IV**

## Annexure - I

### Details for Empanelment of Trainers

| Module Name | Module No. | Name of Trainer/s | Qualification | Experience in yrs | FT/ PT | Remark |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

## Annexure - II

### Space Availability Details

| Module | Space Available (Sq. m.) | Shared Space? (Y/N) | If the space is shared, specify availability of space per day and constraints: | |
|---|---|---|---|---|
| | | | Hrs. per day | Remarks of Inspection Official on adequacy/suitability of space |
| | | | | |
| | | | | |

## Annexure – III
### Equipment & Machinery Details

| Module | Item Description & Specification | Number/ Quantity | Working Condition (Y/N) | Whether Shared (Y/N) | If shared, usage hours per day. | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

## Annexure - IV

### Consumables / Raw Material Details

| Module | Item Description & Specification | Number/ Quantity | Usable Condition (Y/N) | Remarks |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | | | |
| | | | | |

**सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्यांना मंजुरी देण्यासाठी कार्यपद्धती व निकष विहित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१७

वाचा :- १) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.
२) शासन निर्णय क्र.एनजीसी-२००९/(३०१/०९)/मशि-४, दि.२५.९.२००९.
३) शासन निर्णय क्र.एनजीसी-२०१०/(१९३/१०)/मशि-४, दि.३०.१०.२०१०.
४) शासन निर्णय क्र.एनजीसी-२०१२/(२४७/१२)/मशि-४, दि.२.९.२०१३.

**प्रस्तावना :-**

राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्यासाठी व इतर अनुषंगिक बाबींसाठी महाराष्ट्र शासनाने “महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६” अंमलात आणलेला आहे. सदर अधिनियमातील कलम १०९(४) नुसार नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मंजुरीसाठी कालबद्ध तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच, या तरतुदीस अनुसरुन अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कार्यपद्धती निश्चित करावी, अशी तरतूद कलम १०९ (९) अन्वये करण्यात आली आहे. सदरहू तरतुदींच्या अनुषंगाने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मंजुरीसाठी कार्यपद्धती व निकष सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र. २, ३, ४ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय:-**

१. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीसाठी मंजुरी देण्यासाठी पुढे विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

**कार्यपद्धती :-**

१.१ विद्यापीठांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात उच्च शिक्षणाच्या सुविधांचे सर्वत्र समान वाटप होण्यासाठी “महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६” च्या कलम १०७ मधील तरतुदीनुसार एक सम्यक योजना (Perspective Plan) तयार करावी.

१.२ सर्व विद्यापीठांनी पाच वर्षांचा बृहत आरखडा करावा, त्यामध्ये ज्या जिल्ह्यामध्ये महाविद्यालयीन शिक्षणात ढोबळ पटसंख्या प्रमाण (जीईआर) राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे असे जिल्हे, नक्षलग्रस्त, आदिवासी, डोंगराळ /दुर्गम भागासाठी सर्वोच्च प्राथम्य द्यावे व त्या प्राथम्यक्रमानुसार व तद्नंतर सर्वसाधारण याप्रमाणे त्या-त्या शैक्षणिक वर्षासाठी विशिष्ट एवढ्याच नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीच्या (व्यावसायिक (AICTE व NCTE मंजुरी देत असलेले) अभ्यासक्रम सोडून) मंजुरीच्या प्रस्तावांची शिफारस करावी.

१.३ सदर सम्यक योजना महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाकडून मान्य करुन घ्यावी.

१.४ सम्यक योजनेस अनुसरुन विद्यापीठांनी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासाठी वार्षिक योजना तयार करावी.

१.५ वार्षिक योजनेत समावेश असलेल्या ठिकाणांसाठीचे बिंदु निश्चित केल्यानंतर सर्व अकृषी विद्यापीठांनी बृहत आराखडयातील ठिकाणासह वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागवावेत. बृहत आराखडयाबाहेरच्या ठिकाणासाठी अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करण्यात यावा व तसे स्वीकारु नयेत.

१.६ नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या सुरु करण्यास इच्छूक संस्थांनी "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६" च्या कलम १०९ (४) (क) मधील तरतुदीनुसार सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील अर्जाच्या नमुन्यात संबंधित विद्यापीठाकडे अर्ज दाखल करावेत. त्यासोबत परिशिष्ट "ब"मध्ये नमूद केलेली कागदपत्रे जोडण्यात यावीत.

१.७ विद्यापीठांनी ऑनलाईन (Online) पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज स्वीकारावेत. अर्जात भरण्यात आलेली माहिती व त्यासोबत जोडणे आवश्यक असलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी एक तपशीलसूची तयार करुन आवश्यक बाबींची पूर्तता करणारेच अर्ज स्वीकारावे. ज्या विद्यापीठाकडे ऑनलाईन पद्धतीने संगणकप्रणाली विकसित करण्यात आलेली नाही, अशा विद्यापीठांनी पुढील एका वर्षात अर्ज स्वीकारण्याची संगणकप्रणाली विकसित करणे अनिवार्य राहील.

१.८ विद्यापीठांकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याकरिता आवश्यक तेवढ्या छाननी समित्या विद्यापीठांचे कुलगुरु नियुक्त करतील.

१.९ प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची पडताळणी सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट "ब" मध्ये नमूद करण्यात आलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या सूचीनुसार करुन छाननी समिती त्यांचा अहवाल १५ ऑक्टोबर पर्यंत कुलगुरुंना सादर करतील.

१.१० ज्या संस्थेच्या प्रस्तावात किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आल्यास त्या संस्थेस / अर्जदारास २० ऑक्टोबर पर्यंत त्रुटी कळविण्यात येतील.

१.११ त्रुटी कळविण्यात आलेल्या संस्थांनी ३१ ऑक्टोबरपर्यंत विद्यापीठाकडे त्रुटीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

१.१२ त्रुटीच्या पूर्ततेच्या अर्जाची छाननी समितीकडून छाननी करुन त्यासहीत छाननीत पात्र झालेल्या अर्जासह अहवाल १५ नोव्हेंबरपर्यंत अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ यांना सादर करण्यात येईल.

१.१३ संबधित विद्यापीठाचे कुलगुरु विद्यापीठस्तरावर आवश्यक तेवढ्या तज्ज्ञ समिती गठित करतील. सदर तज्ज्ञ समितीमध्ये छाननी समितीच्या सदस्यांच्या अंतर्भाव असणार नाही. सदर तज्ज्ञ समितीने १५ डिसेंबरपर्यंत प्रत्यक्ष भेटी देऊन नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीसाठी संबंधित संस्थांची सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट "ब" मध्ये विहित करण्यात आलेल्या सूचीनूसार तयारी आहे किंवा कसे, याबाबत काटेकोर परिक्षण करुन त्यांचा अहवाल व्हिडीओ छायाचित्रणासह १५ जानेवारीपर्यंत अध्यक्ष, अधिष्ठता मंडळामार्फत कुलगुरुंना सादर करण्यात येईल. सदर पायाभूत सोयीसुविधा पूर्ण न करणाऱ्या संस्थांची शिफारस विद्यापीठ करणार नाही.

१.१४ कुलगुरुंकडून संबंधित पात्र संस्थांना २५ जानेवारी पर्यंत पात्रता व अपात्रता कळविण्यात येईल.

१.१५ अपात्रता कळविलेल्या संस्था १५ फेब्रुवारीपर्यंत त्याविरुद्ध विद्यापीठाकडे अपिल दाखल करु शकतील. सदर अपिलावर (गरजेनुसार तज्ज्ञ समिती पाठवून अहवाल घेऊन) १५ मार्चपर्यंत कुलगुरु निर्णय देतील.

१.१६ सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज मंजुरीच्या शिफारशीसह विद्यापीठाकडून प्रपत्र-"ब" सह शासनाकडे दिनांक १ एप्रिलपर्यंत सादर करण्यात येतील.

१.१७ विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या व शासनस्तरावरील छाननीअंती पात्र ठरलेल्या प्रस्तावावर शासनाकडून १५ जूनपर्यंत परवानगी कळविण्यात येईल.

१.१८ वरील तारखांच्या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, उपरोक्त तारखांना सार्वजनिक / स्थानिक सुट्टी असल्यास त्याच्या पुढील कार्यालयीन दिवशीची तारीख ही अंतिम तारीख असेल.

१.१९ वरील परि. १.८ मध्ये विहित केलेली छाननी समिती व परि. १.१३ मध्ये विहित केलेली तज्ज्ञ समिती यांची संख्या ती-ती विद्यापीठे त्या-त्या वर्षी सुरु करावयाचा नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा व अतिरिक्त तुकडी वाढ यांची व्याप्ती विचारात घेऊन ठरवतील व विहित केलेल्या वेळापत्रकात काम होईल, याची खातरजमा करतील.

२. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मंजुरी देण्यासाठी पुढे विहित केलेल्या निकषांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

**निकष :-**

२.१ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील कलम १०९(६) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विद्यापीठ नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासाठीचा उच्च शिक्षणाच्या विद्यमान महाविद्यालयाचा किंवा परिसंस्थेचा अर्ज, जर -

**(क)** ते, अधिस्विकृती अधिकरणांच्या (NAAC) मानांकनानुसार अधिस्विकृती किंवा पुनर्रअधिस्विकृती मिळण्यासाठी पात्र आणि अपेक्षित असले तरीसुद्धा, एकतर राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्विकृती परिषदेकडून किंवा राष्ट्रीय अधिस्विकृती मंडळाकडून (NBA) अधिस्विकृती किंवा पुनर्रअधिस्विकृती करण्यात आली नसतील ; आणि

**(ख)** राज्य शासनाने निर्धारित केलेल्या शर्तीचे ते अनुपालन करीत नसतील तर, राज्य शासनाकडे पाठविणार नाही.

त्याचप्रमाणे, ज्यांची यापूर्वीची महाविद्यालये अस्तित्वात आहेत, त्यांचेबाबतीत पुढील पूर्तता नसलेल्या संस्थांचे अर्ज शासनाकडे शिफारशीत करु नयेत.

**अ)** ज्या संस्थांच्या महाविद्यालयातील प्राचार्यांसहित सर्व अध्यापकांची पदे अर्हताधारक व पात्र उमेदवारामधून भरलेली नसतील तर.

**ब)** यासोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब, क, ड ची पूर्तता करत नसतील तर,

२.२ शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्यांची मान्यता ही कायम विनाअनुदानित तत्वावर राहील.

२.३ नवीन पाठ्यक्रमाची शिफारस करताना अशा अभ्यासक्रमास शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळ यांची मान्यता आवश्यक असल्यास त्यांच्या मान्यतेशिवाय असा पाठ्यक्रम शिफारशीत करण्यात येऊ नये.

२.४ ज्या महाविद्यालयाकरिता नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी प्रस्तावित करण्यात आलेली आहे, त्या महाविद्यालयामध्ये अस्तित्वात असलेल्या अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकड्यांना शासन मान्यता आहे, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत, याची खातरजमा केल्यानंतरच प्रस्ताव शिफारशित केले जावेत.

२.५ ज्या महाविद्यालयाकरिता नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी प्रस्तावित करण्यात आलेली आहे, त्या वाढीव अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीकरीता शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार वाढीव भौतिक व मूलभूत सुविधा उपलब्ध असल्याची प्रमाणित कागदपत्रे महाविद्यालयांनी अर्जासोबत जोडणे आवश्यक असून, विद्यापीठाने ही बाब प्रमाणित करावी.

२.६ ज्या महाविद्यालयाकरीता नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मंजूर करण्यात आलेली आहे, त्याकरिता विहित निकषांप्रमाणे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी नियुक्त केले असल्याचे प्रमाणपत्र विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी पुढील ०६ महिन्यांमध्ये शासनास सादर करावे.

३. विद्यापीठांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविताना त्यात नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी असे वर्गीकरण केलेले असेल.

४. विद्यापीठांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविताना प्रस्ताव विहित केलेल्या निकषांची पूर्तता करीत असल्याची खात्री करावी. विहित निकषांची पूर्तता होत नसतानासुद्धा प्रस्ताव शासनस्तरावर विद्यापीठाकडून शिफारशित केले गेल्यास, अशा शिफारस केलेल्या प्रकरणी शासनास नाहक न्यायालयीन प्रकरणास सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे विहित निकषांची पूर्तता करीत नसताना प्रस्ताव शासनास सादर झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यापीठाची पर्यायाने प्र.कुलगुरु तथा अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ यांची राहील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१२१३०११३४८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=440c600559857f4234e969f892346c88247ac81346a1b7229bf9917deb7bce48, cn=Rohini Bhalekar
Date: 2017.09.13 17:34:04 +05'30'

**(रोहिणी भालेकर)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) मा. मंत्री (उ. व तं. शि.) यांचे विशेष कार्य अधिकारी.
४) मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव.
५) अपर मुख्य सचिव (उ. व तं. शि.) यांचे स्वीय सहायक.
६) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
७) विशि-३, विशि-४ कार्यासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.
८) निवड नस्ती (मशि-४)

# * परिशिष्ट-अ *

## नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी

<table>
<tr><td>१.</td><td>संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता :<br>(दुरध्वनी क्रमांकासह)</td><td colspan="4"></td></tr>
<tr><td>२.</td><td>महाविद्यालयाचे नाव आणि पूर्ण पत्ता :</td><td colspan="4"></td></tr>
<tr><td>३.</td><td>ज्या महाविद्यालयात नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करावयाची आहे, त्या ठिकाणाची लोकसंख्या :</td><td colspan="4"></td></tr>
<tr><td>४.</td><td>महाविद्यालयात नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करावयाचे सत्र :</td><td colspan="4"></td></tr>
<tr><td rowspan="5">५.</td><td rowspan="5">अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी अस्तित्वात असल्यास त्याचा तपशिल (मुळ तुकडी अनुदानावर असेल तर तसा स्पष्ट उल्लेख करावा) :<br>तुकड्यांचा प्रकार नमूद करण्यात यावा. (अनुदानित/विना अनुदानित/कायम विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यित)</td><td></td><td>✓</td><td>विषय</td><td>विद्यार्थी संख्या</td></tr>
<tr><td>विद्याशाखा</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>विषय</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>तुकडी</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>६.</td><td colspan="5">आवेदन शुल्क रुपये-----/-, धनाकर्ष क्र.----------------<br>दिनांक ------------------ बँकेचे नाव---------------------<br>(धनाकर्ष कुलसचिव,-------------------------विद्यापीठ, यांचे नावे असावा.)</td></tr>
<tr><td>७.</td><td colspan="5">महाविद्यालयात नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करावयाच्या विद्याशाखेचा तपशील :
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>शाखा</th><th>अभ्यासक्रम</th><th>अध्यापनाचे माध्यम</th><th>अध्यापनाचे विषय</th></tr>
<tr><td>१.</td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>२.</td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table></td></tr>
<tr><td>८.</td><td colspan="5">संस्थेचा पंजीयनाचा क्रमांक -------- व दिनांक -----------</td></tr>
<tr><td>९.</td><td colspan="5">संस्थेच्या संविधानात शैक्षणिक बाबींसंबंधी तरतुद असल्यास त्या तरतुदींच्या कलम क्र. व तद्नुसार नविन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासंबंधीचा संस्थेचा ठराव क्र.----- व दिनांक --------</td></tr>
<tr><td>१०.</td><td colspan="5">महाविद्यालयात सुरु करणार असलेल्या प्रस्तावित नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी महाविद्यालयाच्या १५ कि.मी. परिसरातील इतर महाविद्यालयात शिकविले जात असल्यास मागील ०३ वर्षांचा नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीच्या वस्तुस्थितीचा महाविद्यालयांच्या नावासह तपशील :<br>(जागा कमी पडल्यास स्वतंत्र वेगळया कागदावर पुरविण्यात यावी.)</td></tr>
</table>

<table>
<tr><td>११.</td><td>आपण सुरु करणार असलेल्या नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीमुळे व उल्लेखित परिसरातील इतर महाविद्यालयाशी अवास्तव स्पर्धा निर्माण होईल काय ? -------------------------------</td></tr>
<tr><td>१२.</td><td>निरनिराळ्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षात प्रवेशेच्छुक विद्यार्थ्यांची अंदाजित संख्या :
<table>
<tr><th>कला</th><th>वाणिज्य</th><th>विज्ञान</th><th>विधि</th><th>इतर</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table></td></tr>
<tr><td>१३.</td><td>१५ कि.मी. परिसरातील अस्तित्वात असलेल्या उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची मागील ०३ वर्षांची पुढील संदर्भात माहिती द्यावी :
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व पत्ता</th><th>वर्ष</th><th>उच्च माध्यमिक परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या</th><th>उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या</th><th>उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी</th></tr>
<tr><td>१.</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table></td></tr>
<tr><td>१४.</td><td>कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या नविन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी ज्या महाविद्यालयात सुरु करावयाची आहे, ते ठिकाण १२ वी च्या परिक्षेचे केंद्र आहे काय ? --------------------</td></tr>
<tr><td>१५.</td><td>केंद्र असल्यास तेथून १२ वी च्या मार्च व ऑक्टोबरच्या परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची कला, वाणिज्य, विज्ञान शाखानिहाय संख्या ----------------------------------------------------</td></tr>
<tr><td>१६.</td><td>अ) संस्थेद्वारा चालविल्या जाणाऱ्या शाळा व महाविद्यालये यांचा तपशिल----------------------<br>ब) सदर शाळा व महाविद्यालयांची मान्य प्रवेश क्षमता, प्रत्यक्ष प्रवेशित व परिक्षेस बसलेले विद्यार्थी -----------</td></tr>
<tr><td>१७.</td><td>अ) महाविद्यालयासाठी वापरल्या जावयाच्या इमारतीच्या खोल्यांची संख्या व आकार -------------<br>ब) सदर इमारत खोल्यांमध्ये सध्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक किंवा इतर अभ्यासक्रमाचे वर्ग भरतात काय? ------------- ------- असल्यास त्याचा तपशील ------------------------</td></tr>
<tr><td>१८.</td><td>अर्ज केलेल्या वर्षातील ३१ मार्चला असलेली संस्थेची आर्थिक स्थिती :-<br>(अ) स्थावर मालमत्ता<br>(ब) जंगम मालमत्ता<br>(क) बँकेतील रोख<br>(ड) बँकेचे वा इतर कर्ज</td></tr>
<tr><td>१९.</td><td>वरील उल्लेखित बाबींशिवाय महाविद्यालयाच्या आकस्मिक व अनाकस्मिक खर्चासाठी करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतुदींचा तपशील : ------------------------------------------------</td></tr>
</table>

**मूळ सही (शिक्क्याची नाही)**
**अध्यक्ष**
**(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)**

**मूळ सही (शिक्क्याची नाही)**
**सचिव**
**(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)**

*** परिशिष्ट-ब ***

**संस्थेचे नाव :-** **विद्यापीठाचे नाव :**

**ठिकाण :-** **विद्याशाखा :-**

| अ.क्र. | तपासणी सूची | पुर्ततेचा "तपशिल" (होय/नाही) | जोडलेल्या कागदपत्रांचा पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | संस्थेचा विहित नमुन्यात अर्ज. | | |
| २. | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. | | |
| ३. | चालू वर्षाच्या तपशिलवार अंदाजपत्रकाची प्रत. | | |
| ४. | घटनेची साक्षांकित प्रत. | | |
| ५. | संस्थेच्या मागील वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची प्रत. | | |
| ६. | संस्थेच्या फिक्स डिपॉजिटची प्रमाणित प्रत.<br>नविन अभ्यास पाठ्यक्रम - रु.५.००लाख<br>विषय - रु.२.००लाख<br>विद्याशाखा - रु.५.००लाख<br>अतिरिक्त तुकडी - रु.३.००लाख | | |
| ७. | संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. | | |
| ८. | संबंधित राष्ट्रीयकृत शेड्युल बँकेत ठेवलेला ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्व परवानगीशिवाय न काढणेबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र. | | |
| ९. | शासनाचे कायम विनाअनुदानित धोरण लक्षात घेता, अर्जासोबत महाविद्यालयाचा नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु.१००/- स्टँपपेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. | | |
| १०. | **१) स्वत:ची जागा -**<br>**अ)** "अ" "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>**ब)** "अ" "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परीसरात किमान १ एकर अकृषक जागा.<br>**क)** "ड" वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>**ड)** "ड" वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परीसरात किमान २ एकर अकृषक जागा. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **इ)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्राची प्रमाणित प्रत.<br>**२) भाडयाची जागा - अ)** “अ” “ब” आणि “क” वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या “नोंदणीकृत कराराची” प्रत.<br>**ब)** “ड” वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या “नोंदणीकृत कराराची ” प्रत.<br>**क)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या “नोंदणीकृत कराराची” प्रत. | | | |
| ११. | **अ) इमारत (स्वत:ची)** - संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे. (सोबतच्या प्रपत्र-अ मध्ये सर्वसाधारण वर्गखोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील जोडला आहे, तो खालील रकान्यात त्यांच्या नावासमोर नमूद करावा. तसेच, वर्ग खोल्यांची संख्याही नमूद करावी.) | | | |
| | **१) शैक्षणिक व प्रशासकीय इमारत :** | **चौ.फु.** | | |
| | १.१ प्राचार्य कक्ष<br>१.२ कार्यालय<br>१.३ इलेक्ट्रॉनिक्स/संगणक प्रयोगशाळा<br>१.४ रसायनशास्त्र प्रयोगशाळा<br>१.५ पदार्थविज्ञान प्रयोगशाळा<br>१.६ जिवशास्त्र प्रयोगशाळा<br>१.७ ग्रंथालय<br>१.८ लेडीज रुम<br>१.९ रेकॉर्ड रुम<br>१.१० नॅक रुम<br>१.११ स्टाफ रुम<br>१.१२ सभागृह<br>१.१३ मोठे व्याख्यान कक्ष<br>१.१४ स्वच्छतागृह (२० विद्यार्थ्यांमागे ०१ स्वच्छतागृह) महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व प्रसाधने<br>१.१५ व्हरांडा<br>१.१६ एन.सी.सी.रुम<br>१.१७ एन.एस.एस.रुम<br>१.१८ वाहनतळ (दुचाकी वाहनांसाठी) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **२) २.१ पाणी सुविधा (पाणी पट्टी पावती)** | | | |
| | **२.२** वीज सुविधा (वीज देयकाची प्रत) | | | |
| | **२.३** ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र) | | | |
| | **३)** होस्टेल सुविधा / परिसरात २० टक्के विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र | | | |
| | **“ब”) इमारत भाडयाची :** (नोंदणीकृत भाडेकरार) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे. (सोबतच्या प्रपत्र-अ मध्ये सर्वसाधारण वर्गखोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील जोडला आहे, तो खालील रकान्यात त्यांच्या नावासमोर नमूद करावा. तसेच, वर्ग खोल्यांची संख्याही नमूद करावी.) | | | |
| | **१) शैक्षणिक व प्रशासकीय इमारत** | **चौ.फु.** | | |
| | १.१ प्राचार्य कक्ष<br>१.२ कार्यालय<br>१.३ इलेक्ट्रॉनिक्स/संगणक प्रयोगशाळा<br>१.४ रसायनशास्त्र प्रयोगशाळा<br>१.५ पदार्थविज्ञान प्रयोगशाळा<br>१.६ जिवशास्त्र प्रयोगशाळा<br>१.७ ग्रंथालय<br>१.८ लेडीज रुम<br>१.९ रेकॉर्ड रुम<br>१.१० नॅक रुम<br>१.११ स्टाफ रुम<br>१.१२ सभागृह<br>१.१३ मोठे व्याख्यान कक्ष<br>१.१४ स्वच्छतागृह (२० विद्यार्थ्यांमागे ०१ स्वच्छतागृह) महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व प्रसाधने<br>१.१५ व्हरांडा<br>१.१६ एन.सी.सी.रुम<br>१.१७ एन.एस.एस.रुम<br>१.१८ वाहनतळ (दुचाकी वाहनांसाठी) | | | |
| | **२) २.१ पाणी सुविधा (पाणीपट्टी पावती)** | | | |
| | **२.२** वीज सुविधा (वीज देयकाची प्रत) | | | |
| | **२.३** ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र) | | | |
| | **३)** होस्टेल सुविधा / परिसरात २० टक्के विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र | | | |
| १२. | १२(अ) व (ब) मधील (१) व (२) साठी फर्निचर किंवा त्यासाठी किमान रु.५.०० लक्ष शिल्लक असल्याबाबतचा पुरावा. | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | जो पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी सुरु करावयाचा आहे ग्रंथालयात पुस्तकाची सुविधा (किमान १०० पुस्तके प्रत्यक्षात हवीत) | | |
| १४. | प्रथमत: महाविद्यालय भाड्याच्या इमारतीत सुरु केले असेल तर प्रथम संलग्निकरण मिळाल्यापासून ५ वर्षामध्ये महाविद्यालय ज्या ठिकाणासाठी मंजुर झाले आहे, त्या ठिकाणी स्वत:चे इमारतीमध्ये स्थलांतरीत करत असल्याबाबतचे हमीपत्र. | | |
| १५. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील कलम १०९(६) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे ज्या संस्थेची यापुर्वीचे महाविद्यालय अस्तित्वात आहे अशा संस्थेने नविन महाविद्यालयाची मागणी केल्यास पुर्वीच्या महाविद्यालयाचे नॅक/एनबीए मूल्यांकन अथवा पूनर्मूल्यांकन असणे आवश्यक आहे. | | |

## परिशिष्ट “क”

## पदवी स्तरावर बायोटेक्नॉलॉजी विषय सुरू करण्यासाठी आवश्यक निकष

| अ.क्र. | तपासणी सूची |
|---|---|
| १ | हा विषय सुरू करताना त्या महाविद्यालयात विज्ञान शाखा असणे आवश्यक आहे |
| २ | सदर महाविद्यालयात विज्ञान शाखा ४ वर्षापूर्वी सुरू झालेली पाहिजे म्हणजेच विज्ञान शाखेची एक बॅच पास असणे आवश्यक आहे. |
| ३ | महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन “अ” श्रेणीचे असणे आवश्यक आहे. |
| ४ | सदर महाविद्यालयातून बायोलॉजीची एक बॅच बाहेर पडली पाहिजे. |
| ५ | या महाविद्यालयात बायोलॉजी, मायक्रोबायोलॉजी,केमेस्ट्री हे विषय पदवी स्तरावर असणे आवश्यक आहे. त्या विषयातील पदवीधारकांची किमान एक बॅच पूर्ण झाली पाहिजे. |
| ६ | भौतिक व मूलभूत सुविधा असणे आवश्यक आहे. |
| ७ | पूर्णवेळ पात्रताधारक शिक्षक असले पाहिजेत. |
| ८ | विद्यापीठ शैक्षणिक अर्हतेप्रमाणे दोन अधिव्याख्याते एम.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी विषयातील व एक एम.एस्सी. मायक्रोबायोलॉजी विषयाचा अधिव्याख्यता फूलटाईम पाहिजे. चौथा शिक्षक एम.एस्सी. केमेस्ट्री, सांख्यीकी पाहिजे. प्रस्तुत अधिव्याख्याता पूर्णवेळ नसला तरी चालेल. |
| ९ | सदर महाविद्यालयात दोन प्रयोगशाळा पाहिजेत. |
| १० | विषय सुरू ठेवण्यासाठी महाविद्यालयाची आर्थिक परिस्थिती चांगली असली पाहिजे. |

## परिशिष्ट "ड"

## पदव्युत्तर स्तरावर बायोटेक्नॉलॉजी विषय सुरू करण्यासाठी आवश्यक निकष

| अ.क. | तपासणी सूची |
|---|---|
| १ | मागणी केलेल्या महाविद्यालयात बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी हा विषय असला पाहिजे. |
| २ | सदर महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन किमान "अ" श्रेणी असले पाहिजे. |
| ३ | विज्ञान शाखेचे सर्व विषय असणे आवश्यक आहे. |
| ४ | बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजीचा विभाग तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीचा असला पाहिजे. |
| ५ | तीन पूर्णवेळ व एक अर्धवेळ शिक्षक असणे आवश्यक आहे. |
| ६ | दोन प्रयोगशाळा सहाय्यक असणे आवश्यक आहे. |
| ७ | किमान ६०० वर्ग फूट जागेच्या दोन प्रयोगशाळा असाव्यात. |
| ८ | भौतिक व मूलभूत सुविधा असणे आवश्यक आहे. |

**प्रपत्र-"अ"**

**परिशिष्ट ब मधील अ.क्र. १२ (अ) व (ब) साठी कक्षनिहाय किमान आवश्यक क्षेत्रफळ**

| अ. क्र. | कक्षाचे नाव | नग | क्षेत्र प्रति नग | एकुण क्षेत्र | कला/विधी/ शिक्षण शाखा | वाणिज्य | विज्ञान | कला + वाणिज्य | कला + विज्ञान | वाणिज्य + विज्ञान | कला, वाणिज्य, विज्ञान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्राचार्य कक्ष | १ | २०*२५ | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| २) | कार्यालय | १ | ३०*२० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ३) | इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | १ | २०*३० | ६०० | -- | -- | ६००(०) | -- | ६००(०) | ६००(०) | ६००(०) |
| ४) | रसायनशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३०*४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ५) | पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा | १ | ३०*४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ६) | जिवशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३०*४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ७) | ग्रंथालय | १ | २०*३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ८) | एनसीसी रुम | १ | २०*१५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| ९) | एन.एस.एस.रुम | १ | २०*१५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| १०) | लेडीज रुम | १ | १०*१५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| ११) | रेकॉर्ड रुम | १ | १०*१५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| १२) | नॅक रूम | १ | १०*१५ | १५० | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) |
| १३) | स्टाफ रूम | १ | २०*३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १४) | सभागृह | १ | ४०*३० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० |
| १५) | मोठे व्याख्यान कक्ष | ३/६/९ | | ९०० | २७०० | २७०० | २७०० | ५४०० | ५४०० | ५४०० | ८१०० |
| १६) | टॉयलेट ब्लॉक | ४ | १०*१५ | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १७) | व्हरांडा | १ | किमान ५ फुट रुंद | | २१०० | २४०० | ३३०० | ३००० | ३८०० | ४१०० | ४६५० |
| | एकूण (किमान आवश्यक क्षेत्रफळ) | | | **१०२५०** | **९२००** | **९५००** | **१४०००** | **१२८००** | **१७२००** | **१७५००** | **२०७५०** |

* **व्यावसायिक महाविद्यालयासाठी स्वतंत्र शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळे असल्यास अशा शिखर संस्था / केंद्रिय नियामक मंडळाच्या नियमानुसार त्यांनी विहित केलेल्या आवश्यक भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधांचे निकष त्यांना लागू राहतील.**

* प्रपत्र-ब *

| क्र. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | प्रस्तावित नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी विद्याशाखेचा तपशिल | विद्यापीठांनी केलेली शिफारस | संस्थेने महाविद्यालयांसाठी आवश्यक विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या मूलभूत सुविधा उपलब्ध केल्या आहेत काय? असल्यास, त्याचा तपशिल | संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे. | ज्या तालुक्यामधील महाविद्यालयात नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मागितली आहे त्या तालुक्यातील महाविद्यालयात अस्तित्वात असणाऱ्या नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीवर विपरित परिणाम होईल किंवा कसे, | तालुक्यामध्ये अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांची नावे व महाविद्यालयांमधील अंतर | तालुक्यामध्ये अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांतील विद्याशाखेंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या विषयाचे गट (व्यावसायिक अभ्यासक्रमांची स्वतंत्र माहिती द्यावी) | गटनिहाय विद्यार्थी संख्या (व्यावसायिक अभ्यासक्रमाची स्वतंत्र माहिती द्यावी | तालुक्यामध्ये महाविद्यालय शाळांमधुन १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्याशाखा निहाय विद्यार्थ्यांची संख्या | मागील वर्षी किती विद्यार्थी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी प्रवेशापासून वंचित राहिले | नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यास परवानगी द्यावी किंवा कसे याबाबतचे विद्यापीठाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | १.<br>२.<br>३.<br>४.<br>५.<br>६.<br>७.<br>८.<br>९.<br>१०.<br>११.<br>१२. | | | | | | | + | |

सुचना : संस्थेने रकाना क्र.४, ५ व १३ सोडून इतर माहिती अचूक भरावी. त्यातील चुकांची जबाबदारी संस्थेची राहील.

मूळ सही (शिक्क्याची नाही)
अध्यक्ष
(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)

मूळ सही (शिक्क्याची नाही)
अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ, संबंधित अकृषि विद्यापीठ

**सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालयांना (पारंपारिक व व्यावसायिक) मंजुरी देण्यासाठी कार्यपद्धती व निकष विहित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १५ सप्टेंबर, २०१७.

वाचा :-१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.
२) शासन निर्णय क्र. एनजीसी-२००९/(३०१/०९)/मशि-४, दि.२५.९.२००९
३) शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१०/(१९३/१०)/मशि-४, दि.३०.१०.२०१०
४) शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१२/(२४७/१२)/मशि-४, दि.२.९.२०१३.

**प्रस्तावना:-**

राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्यासाठी व इतर अनुषंगिक बाबींसाठी महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६" अंमलात आणलेला आहे. सदर अधिनियमातील कलम १०९ (१) (२) (३) नुसार नवीन महाविद्यालय मंजुरीसाठी कालबद्ध तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच, या तरतुदीस अनुसरुन अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कार्यपद्धती निश्चित करावी, अशी तरतूद कलम १०९ (९) अन्वये करण्यात आली आहे. सदरहू तरतुदींच्या अनुषंगाने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय (पारंपारीक व व्यावसायिक) मंजुरीसाठी कार्यपद्धती व निकष सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.२,३ व ४ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय:-**

१. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्याकरिता पुढील प्रमाणे कार्यपद्धती राहील.

**कार्यपद्धती :- (इरादापत्राकरिता)**

१.१ विद्यापीठांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात उच्च शिक्षणाच्या सुविधांचे सर्वत्र समान वाटप होण्यासाठी "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६" च्या कलम १०७ मधील तरतुदीनूसार एक सम्यक योजना (Perspective Plan) तयार करावी.

१.२ सर्व विद्यापीठांनी पाच वर्षांचा बृहत आराखडा करावा, त्यामध्ये ज्या जिल्ह्यामध्ये महाविद्यालयीन शिक्षणात ढोबळ पटसंख्या प्रमाण (जीईआर) राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे असे जिल्हे, नक्षलग्रस्त, आदिवासी, डोंगराळ /दुर्गम भागासाठी सर्वोच्च प्राथम्य द्यावे व त्या प्राथम्यक्रमानुसार व तद्नंतर सर्वसाधारण याप्रमाणे त्या-त्या शैक्षणिक वर्षासाठी विशिष्ट एवढ्याच नवीन महाविद्यालयांच्या (व्यावसायिक (AICTE व NCTE मंजुरी देत असलेले व्यावसायिक अभ्यासक्रम सोडून) व पारंपारिक) प्रस्तावांची शिफारस करावी.

१.३ सदर सम्यक योजना महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाकडून मान्य करुन घ्यावी.

१.४ सम्यक योजनेस अनुसरुन विद्यापीठांनी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी वार्षिक योजना तयार करावी.

१.५ वार्षिक योजनेत समावेश असलेल्या ठिकाणांसाठीचे बिंदु निश्चित केल्यानंतर सर्व अकृषी विद्यापीठांनी बृहत आराखडयातील ठिकाणासह वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागवावेत. बृहत आराखडयाबाहेरच्या ठिकाणासाठी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करण्यात यावा व तसे अर्ज स्वीकारु नयेत.

१.६ नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणा-या इच्छूक संस्थांनी "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६" च्या कलम १०९ (३) (क) मधील तरतुदीनुसार सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील अर्जाच्या नमुन्यात संबंधित विद्यापीठाकडे, ज्यावर्षी इरादापत्र मागविले असेल त्यावर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी अर्ज दाखल करावेत. त्यासोबत परिशिष्ट "ब"मध्ये नमूद केलेली कागदपत्रे जोडण्यात यावीत.

१.७ विद्यापीठांनी ऑनलाईन (Online) पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज स्वीकारावेत. अर्जात भरण्यात आलेली माहिती व त्यासोबत जोडणे आवश्यक असलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी एक तपशीलसूची तयार करुन आवश्यक बाबींची पूर्तता करणारेच अर्ज स्वीकारावेत. ज्या विद्यापीठाकडे ऑनलाईन पद्धतीने संगणकप्रणाली विकसित करण्यात आलेली नाही, अशा विद्यापीठांनी पुढील एका वर्षात अर्ज स्वीकारण्याची संगणकप्रणाली विकसित करणे अनिवार्य राहील.

१.८ विद्यापीठांकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याकरीता आवश्यक तेवढ्या छाननी समित्या विद्यापीठांचे कुलगुरु नियुक्त करतील.

१.९ प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची पडताळणी सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट "ब" मध्ये नमूद करण्यात आलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या सूचीनुसार करुन, छाननी समिती त्यांचा अहवाल कुलगुरुंना सादर करेल.

१.१० ज्या संस्थेच्या प्रस्तावात किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आल्यास त्या संस्थेस / अर्जदारास त्रुटी कळविण्यात येतील.

१.११ त्रुटी कळविण्यात आलेल्या संस्थांनी विद्यापीठाकडे त्रुटीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

१.१२ त्रुटीच्या पूर्ततेच्या अर्जाची छाननी समितीकडून छाननी करुन त्यासहीत छाननीत पात्र झालेल्या अर्जासह अहवाल अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ यांना सादर करण्यात येईल.

१.१३ आवश्यकता असल्यास कुलगुरु विद्यापीठस्तरावर आवश्यक तेवढ्या तज्ज्ञ समिती गठित करतील. सदर तज्ज्ञ समितीमध्ये छाननी समितीच्या सदस्यांच्या अंतर्भाव असणार नाही. अशी तज्ज्ञ समिती गठित केल्यास ही समिती त्यांचा अहवाल अध्यक्ष, अधिष्ठाता मंडळामार्फत कुलगुरुंना सादर करेल.

१.१४ कुलगुरुंकडून संबंधित पात्र संस्थांना पात्रता व अपात्रता कळविण्यात येईल.

१.१५ अपात्रता कळविलेल्या संस्था त्याविरुद्ध विद्यापीठाकडे अपिल दाखल करु शकतील. सदर अपिलावर कुलगुरु निर्णय देतील.

१.१६ सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज मंजुरीच्या शिफारशीसह परिशिष्ट "अ" व "ब" तसेच प्रपत्र "अ" व त्यासोबतच्या सर्व कागदपत्रांसह विद्यापीठाकडून शासनाकडे दिनांक ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी सादर करण्यात येतील.

१.१७ विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या व शासनस्तरावर छाननीअंती अंतिम पात्र ठरलेल्या प्रस्तावासंदर्भात शासनाकडून लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी इरादापत्र देण्यात येईल.

१.१८ वरील परि. १.७ मध्ये विहित केलेली छाननी समिती व परि. १.१२ मध्ये विहित केलेली तज्ज्ञ समिती यांची संख्या ती-ती विद्यापीठे त्या-त्या वर्षी सुरु करावयाच्या नवीन महाविद्यालय (पारंपारिक व व्यावसायिक) यांची व्याप्ती विचारात घेऊन ठरवतील व विहित केलेल्या वेळापत्रकात काम होईल याची खातरजमा करतील.

१.१९ विद्यापीठांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविताना त्यात नवीन पारंपारिक / व्यावसायिक महाविद्यालये असे वर्गीकरण केलेले असेल.

२. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्याकरिता पुढील प्रमाणे निकष राहतील.

**निकष :- (इरादापत्र)**

२.१ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९(२) नुसार, कलम १०७ अन्वये तयार केलेल्या सम्यक योजनेशी सुसंगत नसेल, असे उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठीचा कोणताही अर्ज विद्यापीठाकडून विचारात घेतला जाणार नाही.

२.२ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९(३)(ख) अनुसार आवश्यक बाबींची पूर्तता करतील आणि विहित कालावधीत प्राप्त होतील, केवळ असेच अर्ज विद्यापीठाकडून स्वीकारण्यात येतील आणि विचारात घेण्यात येतील.

२.३ ज्या संस्थांची यापूर्वीची महाविद्यालये अस्तित्वात आहेत, त्यांचेबाबतीत पुढील पूर्तता नसलेल्या संस्थांचे अर्ज शासनाकडे शिफारशीत करु नयेत.

**अ)** ज्या संस्थांच्या महाविद्यालयातील प्राचार्यांसहित सर्व अध्यापकांची पदे अर्हताधारक व पात्र उमेदवारामधून भरलेली नसतील तर तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार भौतिक सुविधा उपलब्ध नसतील तर,

**ब)** राज्य शासनाने निर्धारित केलेल्या अटी व शर्तींचे तसेच, यासोबत जोडलेल्या परिशिष्ट-“अ” व “ब” ची पूर्तता करत नसतील तर,

**क)** मूल्यांकन / पूनर्मूल्यांकनाकरिता पात्र महाविद्यालयांच्या बाबतीत एकतर राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्विकृती परिषदेकडून किंवा राष्ट्रीय अधिस्विकृती मंडळाकडून अधिस्विकृती किंवा पुनर्रअधिस्विकृती करण्यात आली नसेल तर,

परंतु, ज्या महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन / पूनर्मूल्यांकन होऊ शकलेले नाही, अशा महाविद्यालयांची या संदर्भातील लेखी कारणे नमूद करुन त्यांचे स्वतंत्र प्रस्ताव सादर करावेत.

२.४ शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी देण्यात येणारे इरादापत्र हे कायम विनाअनुदानित तत्वावर महाविद्यालय सुरु करण्यासाठी राहील.

२.५ सदर इरादापत्र हे संस्थेने नवीन महाविद्यालयास अंतिम मान्यता प्राप्त करण्यापूर्वी विहित अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या दृष्टिने दिलेले असल्याने, या इरादापत्रामुळे संस्थेस कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत. त्यामुळे असे इरादापत्र देण्यात आले तरी संस्थेस नवीन महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाल्याशिवाय महाविद्यालय सुरु करता येणार नाही.

२.६ शासनाकडून नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता देण्यात आलेले इरादापत्र निकटतम पुढील वर्षाच्या ३१ जानेवारीपर्यंत वैध असेल. या कालावधीमध्ये ज्या अटी व शर्तीच्या आधारे इरादापत्र देण्यात आलेले आहे, त्या अटी व शर्तीची पुर्तता करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल अंतिम मान्यता मिळण्याकरिता आवश्यक असलेल्या कागदपत्रांसह ३१ जानेवारीपर्यंत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य राहील.

२.७ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९(३)(च) अंतर्गत परंतुकामध्ये नमूद केल्याप्रमाणे खंड (ड.) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत, जर व्यवस्थापन इरादापत्रातील शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर करेल तर, इरादापत्र व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल. परंतु तसेच, अपवादात्मक प्रकरणात आणि कारणे लेखी नमुद करुन राज्य शासन, विद्यापीठाने योग्यरित्या प्रक्रिया केलेल्या व्यवस्थापनाच्या अर्जावर वेळोवेळी, इरादापत्राची वैधता एकूण १२ महिन्यापेक्षा जास्त नसेल, अशा आणखी कालावधीसाठी वाढवू शकेल. मात्र याकरिता विनिर्दिष्ट कालमर्यादा संपण्यापूर्वी संस्थेने पूर्ण समर्थनासह विद्यापीठामार्फत शासनाकडे अर्ज करणे आवश्यक राहील.

३. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून ज्या संस्थेस नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्यात आलेले आहे व त्यांनी इरादापत्राच्या अटी व शर्ती पूर्ण केलेल्या आहेत, त्याप्रकरणी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता देण्याकरिता पुढील प्रमाणे कार्यपद्धती राहील.

**कार्यपद्धती :- (अंतिम मान्यता)**

३.१ शासनाकडून नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरिता देण्यात आलेले इरादापत्र निकटतम पुढील वर्षाच्या ३१ जानेवारीपर्यंत वैध असेल. या कालावधीमध्ये ज्या अटी व शर्तीच्या आधारे इरादापत्र देण्यात आलेले आहे, त्या अटी व शर्तीची पूर्तता करुन त्याबाबतच्या अनुपालन अहवालासह नवीन महाविद्यालयास अंतिम मान्यता मागणारा अर्ज संस्थेने आवश्यक असलेल्या कागदपत्रांसह ३१ जानेवारीपर्यंत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य राहील.

३.२ नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता मागणाऱ्या इच्छूक संस्थांनी इरादापत्रातील अटी व शर्तीची पूर्तता केली असल्याचा अनुपालन अहवाल संबंधित विद्यापीठाकडे दाखल करावा. त्यासोबत परिशिष्ट “क” मध्ये नमुद केलेली कागदपत्रे जोडण्यात यावीत.

३.३ विद्यापीठांनी ऑनलाईन (Online) पद्धतीने अनुपालन अहवाल तसेच त्यासंदर्भातील सर्व कागदपत्रे स्वीकारावित. ज्या विद्यापीठाकडे ऑनलाईन पद्धतीने संगणकप्रणाली विकसित करण्यात आलेली नाही, अशा विद्यापीठांनी पुढील एका वर्षात अर्ज स्वीकारण्याची संगणकप्रणाली विकसित करणे अनिवार्य राहील.

३.४ विद्यापीठांकडे प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करण्याकरिता आवश्यक तेवढ्या छाननी समित्या विद्यापीठांचे कुलगुरु नियुक्त करतील.

३.५ प्राप्त अर्जाची व कागदपत्रांची पडताळणी सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट “क” मध्ये नमूद करण्यात आलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या सूचीनुसार तसेच, या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या निकषांनुसार करुन छाननी समिती त्यांचा अहवाल कुलगुरुंना सादर करतील.

३.६ ज्या संस्थेच्या प्रस्तावात किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आल्यास त्या संस्थेस / अर्जदारास त्रुटी कळविण्यात येतील.

३.७ त्रुटी कळविण्यात आलेल्या संस्थांनी विद्यापीठाकडे त्रुटीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

३.८ त्रुटीच्या पूर्ततेच्या अर्जाची छाननी समितीकडून छाननी करुन त्यासहीत छाननीत पात्र झालेल्या अर्जासह अहवाल अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ यांना सादर करण्यात येईल.

३.९ संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु विद्यापीठस्तरावर आवश्यक तेवढ्या तज्ज्ञ समिती गठित करतील. सदर तज्ज्ञ समितीमध्ये छाननी समितीच्या सदस्यांच्या अंतर्भाव असणार नाही. सदर तज्ज्ञ समितीने प्रत्यक्ष भेटी देऊन सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट-“क” मध्ये विहित करण्यात आलेल्या सुचीनुसार तसेच, इरादापत्रामधील अटी व शर्तींनुसार संबंधित संस्थेची तयारी आहे किंवा कसे, याबाबत काटेकोर परिक्षण करुन त्याचा अहवाल व्हिडिओ छायाचित्रणासह अधिष्ठता मंडळामार्फत कुलगुरुंना सादर करेल. विहित केलेले निकष पूर्ण न करणाऱ्या संस्थांची शिफारस विद्यापीठ करणार नाही.

३.१० वरील परि. ३.४ मध्ये विहित केलेली छाननी समिती व परि. ३.९ मध्ये विहित केलेली तज्ज्ञ समिती यांची संख्या ती-ती विद्यापीठे त्या-त्या वर्षी सुरु करावयाच्या नवीन महाविद्यालय (पारंपारिक व व्यावसायिक) यांची व्याप्ती विचारात घेऊन ठरवतील व विहित केलेल्या वेळापत्रकात काम होईल याची खातरजमा करतील.

३.११ कुलगुरुंकडून संबंधित पात्र संस्थांना पात्रता व अपात्रता कळविण्यात येईल.

३.१२ अपात्रता कळविलेल्या संस्था त्याविरुद्ध विद्यापीठाकडे अपिल दाखल करु शकतील. सदर अपिलावर (गरजेनुसार तज्ज्ञ समिती पाठवून अहवाल घेऊन) कुलगुरु निर्णय देतील.

३.१३ सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज व त्यासोबतचा अनुपालन अहवाल मंजुरीच्या शिफारशीसह परिशिष्ट “क” व प्रपत्र “ब” व त्यासोबतच्या सर्व कागदपत्रांसह विद्यापीठाकडून शासनाकडे मे च्या पहिल्या दिवशी किंवा त्याआधी सादर करण्यात येतील.

३.१४ विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता शासनाकडून १५ जूनपर्यंत परवानगी कळविण्यात येईल.

४ सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून ज्या संस्थेस नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्यात आलेले आहे व त्यांनी इरादापत्राच्या अटी व शर्ती पुर्ण केलेल्या आहेत, त्याप्रकरणी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता देण्याकरिता पुढील प्रमाणे निकष राहतील.

**निकष :- (अंतिम मान्यता)**

४.१ नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता इरादापत्र दिलेल्या ज्या महाविद्यालयांनी इरादापत्रामधील अटी व शर्तींची तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांची पूर्तता करुन अनुपालन अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे, अशा प्रस्तावांची शिफारस विद्यापीठाने शासनाकडे करावी.

४.२ विद्यापीठांनी अनुपालन अहवाल स्वीकारताना व शिफारस करताना या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी व सोबत जोडलेल्या परिशिष्ट “क” मधील निकषांची पूर्तता होत असल्याची खातरजमा करुन त्यापुष्ट्यर्थ कागदपत्रे अनुपालन अहवालासोबत क्रमवार पद्धतीने जोडण्यात यावीत.

५. परिशिष्ट “क” मधील अनुक्रमांक ७ (अ) व ७ (ब) साठी परिशिष्ट “ड” मध्ये दर्शविण्यात आलेले कक्षनिहाय आवश्यक क्षेत्रफळ विचारात घेण्यात यावे. यानुसार सर्व शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध असणे तसेच, मागणी करण्यात आलेल्या विद्याशाखानिहाय यासाठी विहित केलेल्या निकषांनुसार बांधकाम पूर्ण असणे आवश्यक राहील.

६. शासनाने विहित केलेल्या निकषांची पूर्तता न करणारे प्रस्ताव विद्यापीठांनी शिफारशीत करु नयेत. विद्यापीठांनी सकारात्मक शिफारस करुनही अंतिम मान्यता प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव अनेक

न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात. त्यामुळे निकषांची व सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारेच प्रस्ताव शिफारशीत होतील, याची दक्षता विद्यापीठाने घ्यावी. अशी पूर्तता न करणारे प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्याची जबाबदारी विद्यापीठाची पर्यायाने प्र.कुलगुरु तथा अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ यांची राहील.

७. नवीन महाविद्यालय सुरु करण्यास देण्यात येणारी मान्यता ही शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कायम विनाअनुदान तत्वावर राहील.

८. ज्या शैक्षणिक वर्षासाठी महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, त्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय सुरु करणे आवश्यक आहे. संलग्निकरण किंवा इतर शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळे यांची परवानगी मिळण्यास विलंब झाल्यामुळे जर महाविद्यालये त्या शैक्षणिक वर्षात सुरु होऊ शकले नाही तर, त्या शैक्षणिक वर्षाच्या पुढील शैक्षणिक वर्षात महाविद्यालय सुरु करणे अनिवार्य राहील. अन्यथा दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१५१३३५३६५२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=440c600559857f4234e969f892346c8824 7ac81346a1b7229bf9917deb7bce48, cn=Rohini Bhalekar
Date: 2017.09.15 15:54:50 +05'30'

**( रोहिणी भालेकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई.
५) सर्व मा.संसद सदस्य/मा.विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
६) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
७) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) महासंचालक, माहिती व जन संपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी)
९) मा. मंत्री (उ. व तं. शि.) यांचे विशेष कार्य अधिकारी.
१०) मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव.
११) सह सचिव (विशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव (उ. व तं. शि.) यांचे स्वीय सहायक.
१३) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
१४) विशि-३, विशि-४ कार्यासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.
१५) निवड नस्ती (मशि-४).

**शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७**

## * परिशिष्ट-अ *

**नवीन महाविद्यालयांकरिता इरादापत्र मागणाऱ्या संस्थेने करावयाचा अर्ज**

| | | |
|---|---|---|
| १. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता :<br>(दुरध्वनी क्रमांकासह) | |
| २. | महाविद्यालयाचे नाव आणि पूर्ण पत्ता : | |
| ३. | ज्या ठिकाणी नवीन महाविद्यालय सुरु करावयाचे आहे, त्या ठिकाणाची लोकसंख्या : | |
| ४. | नवीन महाविद्यालयासाठी इरादापत्र मागण्यात येत असलेले सत्र : | |
| ५. | अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरीक्त तुकडी अस्तित्वात असल्यास त्याचा तपशील (मूळ तुकडी अनुदानावर असेल तर तसा स्पष्ट उल्लेख करावा) :<br>**तुकड्यांचा प्रकार नमूद करण्यात यावा. (अनुदानित/विना अनुदानित/कायम विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यित)** | (तपशील खालील तक्त्यात) |

| | ✓ | विषय | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| **विद्याशाखा** | | | |
| **अभ्यासक्रम** | | | |
| **विषय** | | | |
| **तुकडी** | | | |

६. आवेदन शुल्क रुपये-----/-,         धनाकर्ष क्र.----------------
दिनांक ------------------         बँकेचे नाव---------------------
(धनाकर्ष कुलसचिव,-------------------------विद्यापीठ यांचे नावे असावा.)

७. महाविद्यालय सुरु करावयाच्या अभ्यासक्रमाचा तपशील:

| **अ.क्र.** | **शाखा** | **अभ्यासक्रम** | **अध्यापनाचे माध्यम** | **अध्यापनाचे विषय** |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |

८. संस्थेचा पंजीयनाचा क्रमांक -------- व दिनांक -----------

९. संस्थेच्या संविधानात शैक्षणिक बाबींसंबंधी तरतूद असल्यास, त्या तरतुदींच्या कलम क्र. व तद्नुसार नवीन महाविद्यालय सुरु करण्यासंबंधीचा संस्थेचा ठराव क्र.----- व दिनांक --------

१०. प्रस्तावित महाविद्यालय सुरु करणार असलेले विद्याशाखा, अभ्यासक्रम व विषय हे प्रस्तावित महाविद्यालयाच्या १५ कि.मी. परिसरातील इतर महाविद्यालयात शिकविले जात असल्यास, त्या महाविद्यालयांच्या नावासह तपशील :
(जागा कमी पडल्यास स्वतंत्र वेगळ्या कागदावर तपशील देण्यात यावा.)

११. निरनिराळ्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षात प्रवेशेच्छूक विद्यार्थ्यांची अंदाजित संख्या :

| **कला** | **वाणिज्य** | **विज्ञान** | **विधि** | **इतर** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१२. १५ कि.मी. परिसरातील अस्तित्वात असलेल्या उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची मागील ०३ वर्षांची पुढील संदर्भात माहिती द्यावी :

| **अ. क्र.** | **शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व पत्ता** | **वर्ष** | **उच्च माध्यमिक परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या** | **उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या** | **उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |

१३. कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरीक्त तुकडी ज्या महाविद्यालयात सुरु करावयाची आहे, ते ठिकाण १२ वी च्या परीक्षेचे केंद्र आहे काय ? ------------------------------

| | |
|---|---|
| १४. | केंद्र असल्यास तेथून १२ वी च्या मार्च व ऑक्टोबरच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची कला, वाणिज्य, विज्ञान शाखानिहाय संख्या ------------------------------------------------------ |
| १५. | **अ)** संस्थेद्वारा चालविल्या जाणाऱ्या शाळा व महाविद्यालये यांचा तपशील------------------------<br>**ब)** सदर शाळा व महाविद्यालयांची मान्य प्रवेश क्षमता, प्रत्यक्ष प्रवेशित व परीक्षेस बसलेले विद्यार्थी ---------------------- |
| १६. | **अ)** महाविद्यालयासाठी वापरल्या जावयाच्या इमारतीच्या खोल्यांची संख्या व आकार --------------<br>**ब)** सदर इमारत खोल्यांमध्ये सध्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक किंवा इतर अभ्यासक्रमाचे वर्ग भरतात काय? --- ----------- ------- असल्यास, त्याचा तपशील ------------------------- |
| १७. | अर्ज केलेल्या वर्षातील ३१ मार्चला असलेली संस्थेची आर्थिक स्थिती :-<br>**(अ)** स्थावर मालमत्ता<br>**(ब)** जंगम मालमत्ता<br>**(क)** बँकेतील रोख<br>**(ड)** बँकेचे वा इतर कर्ज |
| १८. | वरील उल्लेखित बाबींशिवाय महाविद्यालयाच्या आकस्मिक व अनाकस्मिक खर्चासाठी करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतुदीचा तपशील : -------------------------------------------------- |

**मूळ सही (शिक्क्याची नाही)**
**अध्यक्ष**
**(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)**

**मूळ सही (शिक्क्याची नाही)**
**सचिव**
**(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)**

**शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७**

*** परिशिष्ट-ब ***

**संस्थेचे नाव :-** **विद्यापीठाचे नाव :**
**ठिकाण :-** **विद्याशाखा :-**

| **अ.क्र.** | **नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देताना विचारात घ्यावयाची तपासणी सूची** | **पुर्ततेचा तपशील (होय/नाही)** | **पृष्ठ क्रमांक** |
|---|---|---|---|
| १. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणारा संस्थेचा विहित नमुन्यात अर्ज. | | |
| २. | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. | | |
| ३. | संस्थेच्या घटनेची साक्षांकित प्रत. | | |
| ४. | चालू वर्षाच्या तपशीलवार अंदाजपत्रकाची प्रत. | | |
| ५. | संस्थेच्या मागील पाच वर्षाच्या अंकेक्षित आर्थिक लेखे-जोखे व लेखापरीक्षण अहवालाच्या प्रती. या आधारे नवीन प्रस्तावित महाविद्यालयाच्या विकास योजनेसाठी उपलब्ध होऊ शकणाऱ्या आर्थिक स्त्रोतांबाबत स्वयंस्पष्ट माहिती. | | |
| ६. | संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. | | |
| ७. | पुढीलप्रमाणे किमान ५ वर्षे, किमान मुदत ठेवची (Fix Deposit) प्रमाणित प्रत.<br>अ) विधी महाविद्यालय : रु. १५.०० लाख<br>ब) पारंपारीक महाविद्यालय : रु. ७.०० लाख<br>(उदा. कला, विज्ञान, वाणिज्य इ.) | | |
| ८. | संबंधित राष्ट्रीयकृत शेड्युल बँकेत ठेवलेला मुदत ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय न काढण्याबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र. | | |
| ९. | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता, मंजुर करण्यात येणाऱ्या नवीन महाविद्यालयासाठी देण्यात येणारे इरादापत्र हे कायम विनाअनुदान तत्वावरील महाविद्यालयासाठी मान्य असल्याबाबतचे रु.१००/- च्या स्टँप पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. | | |
| १०. | संस्थेचे सद्यस्थितीत कनिष्ठ महाविद्यालय अस्तित्वात असेल तर अस्तित्वात असलेल्या इमारतीच्या बांधकामाचा वापर वरीष्ठ महाविद्यालयासाठी केला जाणार नाही, असे हमीपत्र तसेच, कनिष्ठ महाविद्यालयाच्या बांधकामाचा प्रमाणित नकाशा सादर करावा. | | |
| ११. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेच्या सद्य:स्थितीत अस्तित्वात असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार<br>**अ)** मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत<br>**ब)** अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपलब्ध आहेत<br>याबाबत संस्थेचे संबंधित अकृषि विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेच्या सद्यस्थितीत अस्तित्वात असणारी महाविद्यालये मूल्यांकन/ पूनर्मूल्यांकनाकरिता पात्र असल्यास नॅक/ एनबीए मानांकन व मूल्यांकन, पूनर्मूल्यांकन करुन घेतले असल्याचे प्रमाणपत्र. | | |
| १३. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेने बृहत आराखड्यामध्ये निश्चित केलेले बिंदुच्या ठिकाणी जागा उपलब्ध असल्यासंदर्भातील कागदपत्रे.<br>१) <u>स्वत:ची जागा</u> -<br>**अ)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>**ब)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>**क)** "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>**ड)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>२) <u>भाड्याची जागा</u> - **(किमान ०५ वर्षासाठी भाडेकरारनामा)**<br>**अ)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>**ब)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>**क)** "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>**ड)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत. | | |
| १४. | प्रस्तावित महाविद्यालयांसाठी इमारतीचा वास्तुशास्त्रज्ञाकडून तयार करुन घेतलेला नकाशा. | | |
| १५. | प्रस्तावित महाविद्यालयाकरिता भौतिक साधने निर्माण करण्यासाठी भांडवली खर्चाचा टप्पानिहाय विनियोग आणि त्याचे वित्तीय स्त्रोत. तसेच, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी नेमणुकीसंदर्भातील तसेच त्याकरिताच्या वित्तीय तरतुदीचे नियोजन | | |
| १६. | संस्थेचा शिक्षण क्षेत्रातील पूर्वानुभव, संस्थेचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान, विविध शैक्षणिक प्रकल्पांबाबतची माहिती आणि काही ठळक विशेष संपादणूक असल्यास, त्याबाबतची सविस्तर माहिती. | | |
| १७. | प्रस्तावित महाविद्यालयाबाबतचा किमान पाच वर्ष कालावधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल. | | |
| १८. | इरादापत्र ज्या अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात येणार आहे त्या अटी व शर्तींची पूर्तता निकटतम पुढील वर्षाच्या ३१ जानेवारीपर्यंत करण्यात येईल, असे संस्थेचे हमीपत्र. | | |

**शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७**

*** परिशिष्ट-क ***

**संस्थेचे नाव :-** **विद्यापीठाचे नाव :**
**ठिकाण :-** **विद्याशाखा :-**

| **अ.क्र.** | **नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता देताना विचारात घ्यावयाची तपासणी सूची** | **पुर्ततेचा तपशील (होय/नाही)** | **पृष्ठ क्रमांक** |
|---|---|---|---|
| १. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी शासनाने दिलेले इरादापत्र. | | |
| २. | नवीन महाविद्यालयाच्या अंतिम मान्यता मिळण्यासाठी संबंधित संस्थेने सादर केलेला अनुपालन अहवाल. | | |
| ३. | इरादापत्रामध्ये विहित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पूर्तता झाली असल्याचे संस्थेने दिलेले व विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. | | |
| ४. | चालू वर्षाच्या तपशीलवार अंदाजपत्रकाची प्रत. | | |
| ५. | संस्थेच्या मागील वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची प्रत. | | |
| ६. | इरादापत्र देण्याकरिता जे जमिनीचे (स्वत:ची किंवा भाडेतत्वावर) निकष विहित केलेले आहेत, ती जमिन अकृषक (संस्थेच्या नावावर किंवा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर असलेल्या) असल्यासंदर्भातील कागदपत्रे. | | |
| ७. | अ) इमारत (स्वत:ची) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे<br>ब) इमारत (भाड्याची) (नोंदणीकृत भाडेकरार)<br>(सोबतच्या परिशिष्ट-"ड" मध्ये सर्वसाधारण वर्ग खोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील सोबत जोडला आहे.)<br>**१) शैक्षणिक व प्रशासकीय इमारत**<br>१.१) प्राचार्य कक्ष<br>१.२) कार्यालय<br>१.३) इलेक्ट्रॉनिक्स / संगणक प्रयोगशाळा<br>१.४) रसायनशास्त्र प्रयोगशाळा<br>१.५) पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा<br>१.६) जीवशास्त्र प्रयोगशाळा<br>१.७) ग्रंथालय<br>१.८) लेडीज रुम<br>१.९) रेकॉर्ड रुम<br>१.१०) नॅक रुम<br>१.११) स्टाफ रुम<br>१.१२) सभागृह<br>१.१३) मोठे व्याख्यान कक्ष<br>१.१४) टॉयलेट ब्लॉक<br>१.१५) व्हरांडा<br>१.१६) एन.सी.सी. रुम<br>१.१७) एन.एस.एस. रुम | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | **२)** २.१) पाणी सुविधा (पाणी पट्टी पावती)<br>२.२) वीज सुविधा (वीज देयकाची प्रत)<br>२.३) ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र)<br>**३)** हॉस्टेल सुविधा (परिसरात २०% विद्यार्थ्यांची रहाण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र) | | |
| ८. | प्रस्तावित महाविद्यालयाच्या इमारतीत सेमिनार रुम, लेक्चरर रुम, फॅक्टरी रुम, स्टाफ रुम, प्राचार्याची रुम, कॉमन रुम, हॉस्टेल रुम इत्यादी ठिकाणी आवश्यक फर्निचर. | | |
| ९ | ७ (अ) व (ब) मधील १ व २ साठी फर्निचर (खरेदी केल्याची अधिकृत पावती) उपलब्धतेबाबत विद्यापीठाचे प्रमाणपत्र. | | |
| १० | ग्रंथालयात पुस्तकांची सुविधा (मागणी केलेल्या विद्याशाखेशी संबंधित किमान ५०० पुस्तके खरेदी केल्याची अधिकृत पावती) उपलब्धतेबाबत विद्यापीठाचे प्रमाणपत्र. | | |
| ११ | महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेत निर्धारित आवश्यक सामग्री (किमान रु.१.०० लाख प्रत्येक विषयासाठी राखीव) | | |
| १२ | प्रस्तावित महाविद्यालयात विद्यार्थ्यांना खेळण्याची सोय, कॅन्टीन, हेल्थ केअर सुविधा. | | |
| १३ | संबंधित संस्था प्रस्तावित महाविद्यालयाकरिता क्रीडांगण भाड्याने वापरणार असल्यास रु.१००/- च्या स्टँप पेपरवर नोंदणीकृत भाडेकराराची साक्षांकित प्रत. | | |
| १४ | प्रथमत: महाविद्यालय भाडेतत्वावरील इमारतीत सुरु केले जाणार असेल तर प्रथम संलग्निकरण मिळाल्यापासून ५ वर्षामध्ये महाविद्यालय ज्या ठिकाणासाठी मंजूर झाले आहे, त्याठिकाणी स्वत:च्या इमारतीमध्ये स्थलांतरीत करणार असल्याबाबतचे हमीपत्र. | | |
| १५ | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता, अर्जासोबत मंजूर करण्यात येणाऱ्या नवीन महाविद्यालयासाठी नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु.१००/- च्या स्टँप पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. | | |
| १६ | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेच्या सद्यस्थितीत अस्तित्वात असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार<br>**अ)** मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत<br>**ब)** अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपलब्ध आहेत<br>याबाबत संस्थेचे संबंधित अकृषि विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र | | |
| १७ | प्रस्तावित महाविद्यालयामध्ये अर्हताधारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नियुक्तीसंदर्भात संस्थेने केलेल्या कार्यवाहीची माहिती | | |
| १८ | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेच्या सद्य:स्थितीत अस्तित्वात असणारी महाविद्यालये इरादापत्राच्या कालावधीत मूल्यांकन/पूनर्मूल्यांकनाकरिता पात्र ठरली असल्यास नॅक / एनबीए मानांकन व मूल्यांकन, पूनर्मूल्यांकन करुन घेण्यासंदर्भात कार्यवाही सुरु केली असल्याचे प्रमाणपत्र. | | |

**शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७**

**परिशिष्ट -“ड”**

**परिशिष्ट “क” मधील अ.क्र. ७ (अ) व (ब) साठी कक्षनिहाय किमान आवश्यक क्षेत्रफळ**

| अ. क्र. | कक्षाचे नाव | नग | क्षेत्र प्रति नग | एकुण क्षेत्र | कला/विधी/ शिक्षण शाखा | वाणिज्य | विज्ञान | कला + वाणिज्य | कला + विज्ञान | वाणिज्य + विज्ञान | कला,वाणिज्य, विज्ञान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्राचार्य कक्ष | १ | २०X२५ | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| २) | कार्यालय | १ | ३०X२० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ३) | इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | १ | २०X३० | ६०० | -- | -- | ६००(०) | -- | ६००(०) | ६००(०) | ६००(०) |
| ४) | रसायनशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३०X४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ५) | पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा | १ | ३० X ४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ६) | जिवशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३० X ४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ७) | ग्रंथालय | १ | २० X ३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ८) | एनसीसी रुम | १ | २० X १५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| ९) | एन.एस.एस.रुम | १ | २० X १५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| १०) | लेडीज रुम | १ | १० X १५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| ११) | रेकॉर्ड रुम | १ | १० X १५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| १२) | नॅक रूम | १ | १० X १५ | १५० | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) |
| १३) | स्टाफ रूम | १ | २० X ३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १४) | सभागृह | १ | ४० X ३० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० |
| १५) | मोठे व्याख्यान कक्ष | ३/६/९ | | ९०० | २७०० | २७०० | २७०० | ५४०० | ५४०० | ५४०० | ८१०० |
| १६) | टॉयलेट ब्लॉक | ४ | १० X १५ | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १७) | व्हरांडा | १ | किमान ५ फुट रुंद | | २१०० | २४०० | ३३०० | ३००० | ३८०० | ४१०० | ४६५० |
| | **एकूण (किमान आवश्यक क्षेत्रफळ)** | | | **१०२५०** | **९२००** | **९५००** | **१४०००** | **१२८००** | **१७२००** | **१७५००** | **२०७५०** |

* व्यावसायिक महाविद्यालयासाठी स्वतंत्र शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळे असल्यास अशा शिखर संस्था / केंद्रिय नियामक मंडळाच्या नियमानुसार त्यांनी विहित केलेल्या आवश्यक भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधांचे निकष त्यांना लागू राहतील.

शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७

| * प्रपत्र-अ * (इरादापत्राकरिता) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | प्रस्तावित नवीन महाविद्यालयांचा तपशील | विद्यापीठाने केलेली शिफारस | संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे. | तालुक्यामध्ये अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांची नावे व महाविद्यालयांमधील अंतर | गटनिहाय विद्यार्थी संख्या (व्यावसायिक अभ्यासक्रमाची स्वतंत्र माहिती द्यावी | तालुक्यामध्ये महाविद्यालय शाळांमधून १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्याशाखा निहाय विद्यार्थ्यांची संख्या | मागील वर्षी किती विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिले | इरादापत्र देण्याकरिता शासनाने विहित केलेल्या निकषांची पूर्तता सदर संस्था करीत असल्याबाबतचे विद्यापीठाचे प्रमाणपत्र | नवीन महाविद्यालय सुरु करण्यास इरादापत्र द्यावे किंवा कसे याबाबतचे विद्यापीठाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

मूळ सही (शिक्क्याची नाही)
अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ (संबंधित अकृषि विद्यापीठ)

शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७

| * प्रपत्र-ब * (अंतिम मान्यतेकरिता) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | प्रस्तावित नवीन महाविद्यालयांकरीता देण्यात आलेल्या इरादापत्राचा तपशील | इरादापत्रामध्ये विहित केलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता संस्थेने केली आहे काय ? | या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या इतर अटी व शर्तींची पूर्तता संस्थेने केली आहे काय ? | नवीन महाविद्यालय सुरु करण्यास अंतिम मान्यता द्यावी किंवा कसे, याबाबतचे विद्यापीठाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय | विद्यापीठांनी केलेली शिफारस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

मूळ सही (शिक्क्याची नाही)
अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ (संबंधित अकृषि विद्यापीठ)